नवी आशा नवी दिशा

सार्वमत

सार्वमत ५० सुवर्णमहोत्सव १९७६-२०२६

अहिल्यानगर | अंक ९५ | वर्ष ५० वे | शनिवार, २६ एप्रिल २०२५ | पाने १२ | किंमत ₹ ६

पाक सैन्याचे धाबे दणाणले; लष्कर प्रमुखांची भीतीनं गाळण

■ पाकमधील दहशतवाद्यांचेही पलायन ■ शेअर मार्केट बंद

इस्लामाबाद– पहलगाम हल्ल्यानंतर भारत आणि पाकिस्तान यांच्यातील तणाव वाढला आहे. दोन्ही देश एकमेकांची कोंडी करणारे निर्णय घेत आहेत. पाकिस्तानी लष्कर एका बाजूला युद्धाचा सराव करत आहे. क्षेपणास्त्रांची चाचणी सुरू आहे. तर दुसरीकडे लष्कर प्रमुख असलेल्या असीम मुनीर यांनी त्यांच्या कुटुंबाला परदेशी पाठवल्याची माहिती समोर आली आहे. याशिवाय पाकिस्तानी सैन्यातील वरिष्ठ अधिकाऱ्यांनीदेखील त्यांच्या कुटुंबियांना युरोपियन देशांमध्ये पाठवून दिलं आहे.

दरम्यान, पाकिस्तान दशहतवाद्यांना अनेक ठिकाणी प्रशिक्षण देत आहे. पण पंतप्रधान मोदींच्या इशाऱ्यानंतर या तळांवरील दहशतवादी

पळून गेले आहेत. पाकिस्तानी शेअर मार्केटही बंद पडले आहे. असीम मुनीर यांचं भडकाऊ भाषण आणि इशाऱ्यांनंतर काश्मीरच्या पहलगाममध्ये दहशतवादी हल्ला झाल्याची चर्चा सुरू आहे. असीम मुनीरच हल्ल्याचा मुख्य सूत्रधार असल्याचं भारतीय सुरक्षा तज्ज्ञ मानतात. **(पान ६ वर)**

दोन दहशतवाद्यांची घरं उद्ध्वस्त

एकाचे बॉम्बने उडविले तर दुसऱ्याच्या घरावर बुलडोझर

पहलगाम –काश्मीरच्या पहलगाम येथे झालेल्या दहशतवादी हल्ल्याच्या पार्श्वभूमीवर भारतीय सुरक्षा दलाने कारवाईला सुरूवात केली आहे. यावेळी दोन संशयित दहशतवाद्यांची घरं उद्ध्वस्त झाली आहेत. याचे व्हिडीओही समोर आले आहेत. पहलगाममध्ये दहशतवाद्यांनी गोळीबार केला. त्यात २६ पर्यटकांना गोळी मारून ठार करण्यात आले. यामुळे देशभरात संतापाची लाट आहे. याला योग्य ते प्रत्युत्तर दिले जाईल आणि दहशतवाद्यांना कठोरात कठोर शिक्षा दिली जाईल, असा इशाराही पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी दिला आहे.

एक लष्कर-ए-तैयबा (एलईटी) संबंधित आसिफ आणि दुसरा जैश-ए-मोहम्मद (जेईएम) शी संबंधित आदिल यांची घरं उद्ध्वस्त झाली आहेत. **(पान ६ वर)**

दहशतवादी हल्ल्यात मृत्यू पावलेल्या सय्यद शाहच्या कुटुंबाला शिंदेंची मदत

मुंबई (प्रतिनिधी)–जम्मू काश्मीरमधील पहलगाम येथे पर्यटकांवर हल्ला होत असताना स्वतःच्या जीवाची पर्वा न करता पर्यटकांच्या रक्षणासाठी धावून जाणाऱ्या सय्यद आदिल हुसैन शाह या अवघ्या २० वर्षांच्या स्थानिक युवकाचा दहशतवाद्यांच्या हल्ल्यात मृत्यू झाला. सय्यदच्या निधनाबद्दल हळहळ व्यक्त करताना उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी वैयक्तिकरित्या सय्यदच्या कुटुंबियांना पाच लाख रुपयांची मदत केली आहे. तसेच सय्यद आदिलच्या **(पान ६ वर)**

शेती महामंडळाच्या कर्मचाऱ्यांना म्हाडाचे घर

■ अहिल्यानगर जिल्ह्यासह राज्यातील सुमारे २२ हजार कर्मचाऱ्यांना होणार लाभ

मुंबई (प्रतिनिधी)–शेतीमहामंडळाच्या सुमारे २२ हजार कर्मचाऱ्यांनी महामंडळ विकसित करण्यासाठी आपले योगदान दिले आहे. त्यांच्या कामाची दखल घेऊन त्यांना राहण्यासाठी योग्य अशा सदनिका म्हाडाच्या माध्यमातून बांधून देण्याचा निर्णय महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या अध्यक्षतेखाली गुरुवारी झालेल्या बैठकीत घेण्यात आला.

शेती महामंडळाच्या १४ शेतमळ्यांवर २ हजार ९६६ निवासस्थाने आहेत. यापैकी १ हजार ७८६ निवासस्थाने राहण्यास

अयोग्य ठरविण्यात आली आहेत. त्यामुळे ही निवासस्थाने रिक्त करण्याचा प्रस्ताव महामंडळाने बैठकीसाठी ठेवला होता. यावर चर्चा करताना बावनकुळे यांनी शेती महामंडळाच्या सर्वच २२ हजार कर्मचाऱ्यांना म्हाडाच्या माध्यमातून चांगली घरे उपलब्ध करून देण्याचा निर्णय घेतला. गिरणी कामगारांप्रमाणे या कामगारांनाही चांगली घरे मिळाली पाहिजेत, अशी भूमिका त्यांनी यावेळी व्यक्त केली.

या बैठकीत महाराष्ट्र राज्य शेती महामंडळाला उत्पन्न वाढविण्यासाठी ५०० कोटी रुपयांचे उद्दिष्टही देण्यात आले. महामंडळाच्या ताब्यात असलेल्या सुमारे ३० हजार एकर जागेवर विविध उपक्रम राबवून हे उत्पन्न वाढविण्यात यावे. त्याबरोबरच शेती महामंडळाच्या कोणत्याही जागा मोफत वापरासाठी देऊ नयेत, अशा सूचना बावनकुळे यांनी बैठकीत केल्या.

शेती महामंडळाच्या मळ्यावरील सेवानिवृत्त, राजीनामा दिलेल्या तसेच मयत कर्मचाऱ्यांच्या वारसांना बोनस वाटपास मंजुरी देण्यात आली. तर महामंडळाच्या जमिनीवर संयुक्त शेती पद्धतीने पीक योजना राबविण्यासाठी वीज आणि सौरपंप जोडणी मिळण्याबाबत तसेच सोलर **(पान ६ वर)**

शिक्षक भरतीसाठी 'टेट' परीक्षा कार्यक्रम जाहीर

परीक्षेचे ऑनलाईन रजिस्ट्रेशन सुरु

अहिल्यानगर (प्रतिनिधी)– महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेने राज्यातील सर्व स्थानिक स्वराज्य संस्था, खासगी व्यवस्थापनाच्या तसेच शासनाच्या इतर विभागाच्या शाळा पदभरतीसाठी अपेक्षित चाचणी कार्यक्रम घोषित केला आहे. या शाळांमध्ये 'पवित्र' या संगणकीय प्रणालीमार्फत शिक्षक भरतीसाठी शिक्षक अभियोग्यता व बुद्धीमत्ता चाचणी २०२५ जाहीर केली. त्यासाठी ऑनलाईन प्रणाली अर्ज मागविण्यात येत आहे.

ऑनलाईन अर्ज सादर करण्यासाठी २६ एप्रिल ते १० मे अशी मुदत आहे. ऑनलाईन पद्धतीने नमूद परीक्षा शुल्क १० मे पर्यंत भरायचे आहे. परीक्षेच्या सात दिवस आधी ऑनलाईन प्रवेश पत्र उपलब्ध करून घेता येईल. ऑनलाईन परीक्षा २४ मे ते ५ जून दरम्यान भौतिक सुविधा म्हणजे परीक्षा केंद्र व विद्यार्थी संख्येनुसार होणार आहे. एक खबरदारी घेण्याची सूचना आहे. २०१८ व २०१९ साली झालेल्या परीक्षेत गैरप्रकार करणाऱ्या उमेदवारांची यादी प्रसिद्ध झाली आहे. संभाव्य प्रत्येक विद्यार्थ्याने या यादीत आपले नाव आहे अथवा नाही याची खात्री करावी. तेच अर्जात नमूद करावे. चुकीची माहिती दिल्यास कारवाई होणार आहे.

या चाचणी परीक्षेचा आधार उपलब्ध पदसंख्या राहील. राज्यातील शिक्षण सेवक व शिक्षक यांच्या रिक्त पदांची माहिती, विषय, प्रवर्ग, माध्यम व बिंदूनामावली नुसार पवित्र या संगणकीय **(पान ६ वर)**

सावरकरांवरील टिप्पणी प्रकरणात कोर्टाने राहुल गांधींना फटकारलं!

नवी दिल्ली–सर्वोच्च न्यायालयाने शुक्रवारी (२५ एप्रिल) स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्यावरील वादग्रस्त टिप्पणी प्रकरणी काँग्रेसचे नेते राहुल गांधी यांना चांगलंच फटकारलं. यापुढे राहुल गांधी यांनी स्वातंत्र्य सैनिकांबाबत अशी विधानं करू नयेत. तसं केल्यास न्यायालय त्याची स्वत: हून दखल घेईल, अशी तंबी न्यायालयाने राहुल गांधी यांना दिली आहे.

सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती दीपांकर दत्ता आणि न्यायमूर्ती मनमोहन यांच्या द्विसदस्यीय खंडपीठापुढे या प्रकरणाची सुनावणी झाली. सावरकरांवर केलेल्या टिप्पणींच्या प्रकरणात राहुल गांधी यांना सर्वोच्च न्यायालयाने दिलासा दिला आहे. कनिष्ठ न्यायालयांत त्यांच्याविरोधात चाललेल्या खटल्यावरील कारवाईला सर्वोच्च न्यालयाने स्थगिती दिली आहे. असे असले तरी आम्ही स्वातंत्र्य सैनिकांवरील अशा **(पान ६ वर)**

पक्षातून हकालपट्टी केलेल्यांनीच केली श्रीरामपुरात बॅनरबाजी

ना. विखे : शिर्डीत भाजपाचे संघटन पर्व, गाव बस्ती अभियान

शिर्डी (प्रतिनिधी)– ज्यांची पक्षातून हकालपट्टी करण्यात आलेली आहे. त्यांनीच बॅनरबाजी केली. त्याला आम्ही जास्त महत्त्व देत नाही. जे कायमच असंतुष्ट राहीले त्यांना आम्ही संतुष्ट करू शकत नाही, अशा शब्दांत जिल्ह्याचे पालकमंत्री व भाजपचे ज्येष्ठ नेते राधाकृष्ण विखे पाटील यांनी श्रीरामपूर येथे बॅनरबाजी करणारांचा समाचार घेतला.

श्रीरामपूर येथील मंडळ अध्यक्ष निवडीच्या नाराजी नाट्यानंतर झालेल्या बॅनरबाजीवर ना. विखे पाटील यांनी ही प्रतिक्रिया व्यक्त करतानाच जिल्हाभरात पदाधिकाऱ्यांच्या निवडी सर्वसंमतीनेच झालेल्या असल्याचेही सांगितले.

भारतीय जनता पार्टीचं संघटन पर्व, गाव बस्ती संपर्क अभियान आढावा बैठक काल शिर्डीत पार पडली. यासाठी पक्षाचे कार्यकारी अध्यक्ष रवींद्र चव्हाण यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीला विधानपरिषद अध्यक्ष प्रा. राम शिंदे, **(पान ६ वर)**

फ्लेक्स लावणारांचा जाहिरपणे घेतला समाचार

- श्रीरामपूरमध्ये भाजपा तालुका व शहर अध्यक्ष पदाच्या निवडी जाहीर झाल्यानंतर काहींनी या निवडीस आक्षेप घेवून भाजप अध्यक्षपदासाठीच्या वेगवेगळ्या सात अटी व शर्ती असलेले फ्लेक्स श्रीरामपूर शहरात झळकले होते. नंतर परवानगी न घेता लावलेले हे फ्लेक्स नगरपालिकेने काढून टाकले. ना. विखे यांनी हे फ्लेक्स लावणारांचा जाहीरपणे समाचार घेतला.

महत्वाचे

पुण्यात १०० हून अधिक पाक नागरिक

पुणे(प्रतिनिधी)–पुणे पोलीस आयुक्तालयाच्या हद्दीत सध्या एकूण १११ पाकिस्तानी नागरिक वास्तव्यास आहेत. ५६ महिला आणि ३५ पुरुष दीर्घकालीन व्हिसावर भारतात आले आहेत, अशी माहिती विशेष पोलीस शाखेकडून देण्यात आली. या नागरिकांमध्ये बहुसंख्येने दीर्घ मुदतीचा व्हिसा घेतले आहेत. हा व्हिसा पाच वर्षांसाठी वैध असतो, तर व्हिजिटर व्हिसा ९० दिवसांचा असतो.

भारताने आता पाकिस्तानी नागरिकांना भारतात येण्यासाठी व्हिसा कायमचा बंद केला आहे. तसेच जे पाकिस्तानी नागरिक सध्या भारतात आहेत त्यांना देखील देश सोडून जाण्याचे आदेश देण्यात आले आहेत. कॅबिनेट सुरक्षा समितीने घेतलेल्या निर्णयानुसार पाकिस्तानी नागरिकांना ४८ तासांत देश सोडण्याचे निर्देश दिले होते. त्यानंतर व्हिसा रद्द केले जाणार होते. भारताने अटारी-वाघा बॉर्डर बंद करण्याचा निर्णय घेतला आहे. अटारी-वाघा बॉर्डर १ मे पर्यंत बंद राहणार असल्याची माहिती परराष्ट्र मंत्रालयाने दिली आहे.

सिंधू नदीचे पाणी पाकिस्तानात जाऊ देणार नाही

नवी दिल्ली– जम्मू काश्मीरच्या पहलगाम येथे दहशतवाद्यांनी केलेल्या हल्ल्यात २६ जणांचा मृत्यू झाला आहे. यानंतर भारत आणि पाकिस्तान या दोन देशांमधील संबंध ताणले गेले आहेत. यादरम्यान या दहशतवादी हल्ल्यात कथित सहभाग असल्याचा बदला म्हणून भारत पाकिस्तानमध्ये पाण्याचा एक थेंबही वाहून जाऊ देणार नाही, असे जलशक्ती मंत्री सीआर पाटील यांनी शुक्रवारी म्हटले आहे. भारतातून एक थेंबही पाणी पाकिस्तानात जाणार नाही याची आम्ही काळजी घेऊ, असे सीआर पाटील म्हणाले आहेत.भारताने १९६० चा पाकिस्तानबरोबर करण्यात आलेला सिंधू जल करार रद्द करण्याचा निर्णय घेतल्यानंतर गृहमंत्री अमित शाह यांच्या अध्यक्षतेखाली पुढील धोरण ठरवण्यासाठी बैठक घेण्यात आली.

शिर्डी विमानतळावर होणार दोन हेलिपॅड, आठ वाहनतळं

वृत्त आतील पानात

डॉक्टरला मारहाण करून मानहानी करणाऱ्या १७ आरोपींना शिक्षा

■ जिल्हा न्यायालयाचा निकाल; अहिल्यानगर शहरात घडली होती घटना

अहिल्यानगर (प्रतिनिधी) – डॉ. प्रकाश कन्हैयालाल कांकरीया (रा. माणिक चौक, अहिल्यानगर) यांच्या साई सुर्या नेत्रालय हॉस्पिटलमध्ये घुसून त्यांच्यावर हल्ला करून सार्वजनिकरित्या मानहानी करणाऱ्या १७ आरोपींना येथील जिल्हा व सत्र न्यायाधीश श्रीमती एस. व्ही. सहारे यांनी विविध भारतीय दंड संहितेच्या कलमांन्वये दोषी ठरवत प्रत्येकी एक वर्ष साध्या कैदेची व एकूण ११ हजार रुपये दंडाची शिक्षा

सुनावली.

संजीव बबनराव भोर (रा. पाईपलाईन रस्ता, पंचवटीनगर, अहिल्यानगर), महादेव परशुराम भगत, बलभीम परशुराम भगत (दोघे रा. कापुरवाडी, ता. अहिल्यानगर), बाबासाहेब बाबुराव जरे (रा. इमामपूर, ता. अहिल्यानगर), संतोष विठ्ठल वाडेकर (रा. देसवडे, ता. पारनेर), आदिनाथ शंकरराव काळे (रा. वांजोळी, ता. नेवासा), रमेश अशोक बाबर (रा. बाबर मळा, बुरूडगाव रस्ता), किशोर सुनील आर्डे (रा. बोल्हेगाव), अरूण बाबासाहेब ससे (रा. जेऊर ता, अहिल्यानगर), संदीप ऊर्फ मेजर शंकर पवार, शरद ऊर्फ बाळू गदाधर (दोघे रा. एमआयडीसी, अहिल्यानगर), कैलास शिवाजी पठारे (रा. जेऊर, ता. अहिल्यानगर), योगेश उर्फ भावड्या गोविंद आर्डे, गणेश उर्फ भैया जितेंद्र शिंदे, विठ्ठल उमेश गुडेकर, बापू बाबासाहेब विरकर (रा. मल्हारनगर, एमआयडीसी, अहिल्यानगर) आणि सागर कडुबा घाणे (रा. नवनागापूर, एमआयडीसी, अहिल्यानगर) अशी शिक्षा झालेल्या आरोपींची नावे आहेत. **(पान ६ वर)**

देश तोडण्याचा दहशतवाद्यांचा मनसुबा उधळू-राहुल गांधी

श्रीनगर– पहलगाम दहशतवादी हल्ल्यानंतर आज विरोधी पक्षनेते राहुल गांधी जम्मू-काश्मीरमध्ये पोहोचले. लोकसभेतील विरोधी पक्षनेत्यांनी श्रीनगरमध्ये हल्ल्यात जखमी झालेल्या लोकांची भेट घेतली. यावेळी काँग्रेस खासदार म्हणाले, हे पाहून दुःख होते की काही लोक काश्मीर आणि देशाच्या इतर भागांतील माझ्या बंधू-भगिनींवर हल्ला करत आहेत.

काँग्रेस खासदार म्हणाले, मला वाटते हे खूप महत्त्वाचे आहे की आपण सर्वांनी एकत्र उभे राहावे, एकजूट राहावे आणि या घृणास्पद कृत्याचा मुकाबला करावा आणि दहशतवादाला कायमचे पराभूत करावे. ते म्हणाले, मी मुख्यमंत्री आणि नायब राज्यपाल (एलजी) यांनाही भेटलो आणि त्यांनी मला जे काही घडले त्याबद्दल माहिती दिली. मी त्या दोघांनाही आश्वासन दिले की, माझा पक्ष आणि मी त्यांना पूर्ण पाठिंबा देणार आहोत.

पाळीव प्राणी, कुत्रे, मांजरे, उंदरांसाठी स्वतंत्र स्मशानभूमी

अहिल्यानगर (प्रतिनिधी)– राज्यभर पाळीव प्राणी कुत्रे, मांजरे पांढरे, उंदीर या प्राण्यांचा अंत्यविधी करताना योग्य दक्षता न घेतल्यास दुर्गंधी व आजार पसरण्याची शक्यता आहे. यामुळे यापुढील काळात पाळीव प्राण्यांच्या अंत्यविधीसाठी संबंधित महानगरपालिका, नगर परिषद किंवा नगर पंचायतीच्या आवारात घनकचरा व्यवस्थापन केंद्र शेजारी

नगर विकास विभागाचे आदेश, राज्यभर होणार अंमलबजावणी

या प्राण्यासाठी सशुल्क स्मशानभूमी उपलब्ध करून देण्याचे आदेश राज्य सरकारच्या नगर विकास विभागाच्या वतीने काढण्यात आले आहेत.

राज्यभर पाळीव कुत्रे, मांजरे, पांढरे उंदीर आणि गोवंशीय जनावरे या प्राण्यांच्या स्मशानभूमीच्या व्यवस्थेबाबत विधानसभा सदस्य प्रताप सरनाईक यांनी २५ जुलै २०२३ च्या विधानमंडळाच्या चर्चेत मुद्दा उपस्थित केला होता. या चर्चेनुसार राज्य सरकारने पाळीव प्राण्यांच्या स्मशानभूमी बाबत शासन निर्णय जाहीर केला आहे. यापूर्वी राज्यातील काही **(पान ६ वर)**

अहिल्यानगर, श्रीरामपूरमध्ये १४ पाकिस्तानी नागरिकांचा दीर्घकालीन वावर

■ फक्त तिघांचा नागरिकत्वासाठी अर्ज

अहिल्यानगर (प्रतिनिधी)– जिल्ह्यात १४ पाकिस्तानी नागरिक दीर्घ काळापासून वास्तव्य करत असल्याचे समोर आले आहे. यामध्ये एका पुरूषासह १३ महिलांचा समावेश आहे. हे सर्वजण दीर्घ मुदतीच्या व्हिसावर भारतात राहत असून, यापैकी अनेकजणी विवाहानंतर भारतात स्थायिक झालेल्या आहेत, अशी माहिती जिल्हा पोलीस अधीक्षक राकेश ओला यांनी दिली.

जम्मू-काश्मीरमधील पहलगाम येथे अतिरेक्यांनी पर्यटकांवर केलेल्या गोळीबारानंतर केंद्र सरकारने पाकिस्तानी नागरिकांना ४८ तासांत भारत सोडण्याचा आदेश दिला. या पार्श्वभूमीवर जिल्हा पोलीस दलाने तपासणी केली असता, जिल्ह्यात दीर्घकालीन व्हिसावर राहणारे १४ पाकिस्तानी नागरिक असल्याचे आढळले. या १४ नागरिकांमध्ये ११ जण अहिल्यानगरमध्ये तर उर्वरित तीन श्रीरामपूर येथे राहत आहेत. एक महिला १९५९ मध्ये **(पान ६ वर)**